## प्रकरण पाचवे

### मंतरकैफ : एक रसास्वाद

प्रा. नलगे यांचा " मंतरकैफ " हा तिसरा ललितलेखसंग्रह १९९० साली प्रसिध्द झाला. यांत एकूण बारा ललितलेखांचा समावेश आहे. "" बरचसं मनांत साठवायचं, साठवलेलं आठवायचं, आठवांचं चांदण फुलवायचं "[1] असं त्यांनीच " मंतरकैफ " ( पान १६) मध्ये म्हटल्याप्रमाणे हे सगळे ललितलेख त्यांच्या बालपणांतल्या आठवणीवर आधारलेले आहेत. या आठवणी म्हणजे त्यांचा जिवंत, रसरसता अगदी ताजा असा अनुभव ! लेखकाचे लेखन हेत्याचे जगणेअसते. लेखकाचे किंवा कोणाही माणसाचे व्यक्तिमत्व किंवा त्याचे वैचारिक व्यवहार किंवा त्याच्या स्वभावाची ठेवण, ही त्याच्या जगण्या-भोगण्यातूनच आकारत असते. तो ज्या पर्यावरणात राहतो त्या पर्यावरणाच्या घटकाचे परिणाम त्याच्यावर होत असतात. आणि " अंतरीचे भावे । स्वभावे बाहेरी " या न्यायाने ते त्याच्या लेखनातही आविष्कृत होते. लेखकाचा परिसर, परिसरांतील निसर्ग, त्यांतील माणसे, पशुपक्षी, त्या परिसराचा एकूण सांस्कृतिक इतिहास इ.च्याएक-रसायनाने लेखकाचे व्यक्तिमत्व बनते आणि ते आवश्यक तेव्हा रसरंगरूप गंध स्पर्श आणि नाद या सर्व संवेदनानी "कलाकृती"च्या रूपाने साकारते. प्रा. चंद्रकुमार नलगे यांचे व्यक्तिमत्व याच प्रकारचे आहे. त्यांचे बालपण ज्या परिसरात गेले, तो भौगोलिक परिसर - तेथील निसर्ग, पशुपक्षी एवढेच नव्हे, तर तिथल्या सांस्कृतिक वातावरणासह-त्यांच्या ललितलेखनांत साकार होतो. आणि हे सगळे स्वानुभूत आहे, भोगले-अनुभवले आहे, कमालीच्या संवेदनशीलतेने, ग्रामीण शब्दकळेत चपखलपणे टिपले साकारले आहे., म्हणून " रसार्द्र"

झाले आहे, याचा प्रत्यय वाचकांना येतो. लेखकाचे बालपण वारणा खो-यात गेले. त्या खो-यांतील जिवंत अनुभवाची स्मरणे म्हणजे या ललितलेखांचे आशयद्रव्य होय !

आशयद्रव्याची तिहेरी .. वीण

या ललित लेखातील आशयद्रव्याची वीण तिहेरी आहे. " मंतरकैफ " मधील तीन लेखांचा आशय सामाजिक, राजकीय संबंध असलेला, असा आहे. सहा लेखमधून वारणा खो-यातील निसर्गाचे रौद्र-सुंदर रूप दिसते आणि उरलेल्या तीन लेखांमधून काही व्यक्तिरेखाटने आढळतात. पण या आशयाचा मूलभूत पाया आहे तो ग्रामीण समाज-जीवनच. शहरापासून दूरदूर, पन्नाससाठ वर्षापूर्वीचे कृषीप्रधान ग्रामजीवनच या सर्व ललितलेखांना अस्तर लावल्याप्रमाणे चिकटले आहे. स्वत: लेखकच शेतकरी-कष्टकरी कुटूंबातला असल्याने या स्मरणांना आजही जिवंत अनुभवाचे रूप प्राप्त झाल्यासारखे दिसते. ही स्मरणे जेवढी व्यक्तिगत जीवनाशी निगडित आहेत, तेवढीच ती भोवतालच्या समाजजीवनशीही निगडित आहेत. म्हणजेच या स्मरणांना तत्कालीन राजकीय, सामाजिक घटनांचे भान आहे. जवळजवळ तीन ललितलेखांमधून ४२ ची " चले जाव" ची घोषणा, भूमिगताची चळवळ आणि प्रति सरकार यांचा उल्लेख येतो. निम्मे ललितलेख वारणाखो-याचे " निसर्गदर्शन " घडवितात. एखादी व्यक्तिरेखा, पु. ल. देशपांडे यांच्या व्यक्तिरेखेच्या जवळपास जाते तर कांही " चेह-याविना" कोसळतात.

वारणा खोरा : आनंदमयी गारव्याचा मुलुख !

प्रा. नलगे यांच्या कुठल्याही ललितलेखांत वारणा खो-याचा कोणता ना कोणता एक तरी तुकडा आलेला असतोच. हे खोरे त्यांच्या रक्तातच भिनून गेलेय ! त्यांच्या श्वासोच्छवासाची लय ही पण वारणाईच्या

प्रवाहलयीचीच असावी, इतकी एकरूपता, इतके तादात्म्य, नलगे यांचे आपल्या भूमीशी झालेले आहे. वारणा खोरेबद्दल ते लिहितात -
" हा खळाळत्या चैतन्याचा, हिरवाईच्या राया अंगभर लेऊन बसलेला नजरबंद वारणा खोरा. या अवलियाच्या नगरीत उतरणारी दारं म्हणजे या खिंडी ( खो-यातल्या). हा आनंदमयी गारठ्याचा मुलुख म्हणजे कुणी देवलोकीचा नजरबंद, देखणा भूल पाडणारा गंधव. "१
" नजरबंद मुलुख - जेरबंद अवलिया" या लेखांत नलगे यांनी चैत्राच्या हिरवाईचे फार सुंदर दर्शन घडवले आहे. चैत्र म्हणजे नवनिर्मिती, प्रसन्नता आणि तृप्तता. या वेळी निसर्ग आणि मानव या दोघानाही आनंद होतो. याच लेखांत साताळी देवीची यात्रा आलेली आहे. या देवीचे दर्शन आईबरोबर घेतांना लेखकाला होणारा आनंद अवर्णनीय आहे. पुढे नलगे यानी वारणाखोऱ्यांतल्या अनेक खिंडीचा परिचय वाचकांना करून दिला आहे. प्रत्येक खिंडीशी लेखकाच्या अनेक आठवणी निगडित आहेत. लाडोबाची खिंड मामाच्या सुंदर गावाची आठवणकरून देते, पावल्याची खिंड स्वराज्याच्या इतिहासाची आठवण देते, कारंडयाच्या वाडीची खिंड वडिलांचा रक्तबंबाळ देह समोर उभा करते, जांभळाई खिंड चांभार मित्राच्या करूण जीवनाची कहाणी सांगते, रिळे खिंड बहिणीला मुराळी म्हणून बोलावायला जातानाचा अनुभव ताजा करते. कुसाई खिंड आ ग्याची आठवण देते, या सर्वाहून श्रेष्ठ आठवण वांडरवडयाच्या खिंडीची संभाजीच्या बलिदानाची आठवण करून देणारी. त्यामुळे आजच्या मतलबी जगांत त्यांच्या स्मरणाने आपण संघर्षाचे आव्हान पेलू शकतो. असा हा अवलिया या नजरबंद मुलखांत वास्तव्य करून होता, याचा आपल्याला अभिमान वाटतो असे लेखक शेवटी म्हणतो. " हले डुले पाण्यावरी नांव" या लेखांत वारणाई नदीच्या सौंदर्यावर अनुरक्त झालेल्या आभाळाचे वर्णन अत्यंत देखणे, नीटस रेखीव आणि मोहक असे झाले आहे. आभाळाचे " मानुषीकरण" करून केलेले वर्णन अत्यंत नितांतरमणीय वाटते. वारणाईच्या कुशीत लेखकावर अनेक संस्कार झाले. वारणाईने आपल्यावर प्रेम केले, संघर्ष कसा करावा हे देखील शिकविले, याची कबुली लेखक देतो. तिच्या काठावरचं मोट-मोटवणं,

मोटक-याचं गीत ऐकणं हा आनंद विरळाच. पण आज त्याच वारणा-ईवर इंजन बसवलं गेलं. पूर्वीचे ते सुंदर वातावरण लुप्त झालं. वारणा-ईवर श्रध्दा असणा-यांना ते आवडले नाही. तरीसुध्दा जुने रूप पालटून नव्याची झळाळी दिसू लागली. तिच्या काठच्या दंतकथा, आख्यायिका विसरल्या गेल्या नाहीत. शेवटी पाय घसरून प्रवाहात पडल्याची एक घटना लेखकाने सांगितली आहे. ग्रामजीवनातील सुगीचे दिवस म्हणजे आनंदोत्सवाचे दिवस. सुगीतील " खळं म्हणजे धरित्रीचा, शेतक-याचा तृप्तीचा, सफलतेचा आणि समाधानाचा हुंकार या "खळयाचं" अत्यंत काव्यात्म चित्रण नलगे यांनी " राजवर्खी खळं बिलोरी " या लेखांत केलं आहे. जिवंत निरीक्षण, तपशीलांतील सूक्ष्म बारकावे आणि रंगीन शब्दकळा यामुळे हा संपूर्ण लेखच लालित्याने नटलेला आहे. आकाशांतील चंद्रम्या भोवतीचं राजवर्खी बिलोरी खळयाचं वर्णन करता करताच, लेखक अलगदपणे रानांतील खळयांत शिरतो. शेतक-याच्या सायभरल्या नजरेला धान्यानं भरलेलं खळं कसं दिसतं हे सांगतांना नलगे लिहितात "या खळयातला हा त्याचा क्षण त्याच्या जीवनातला समाधानाचा परमोच्च क्षण असतो..... समुद्रांत उभारलेल्या सोन्याच्या द्वारकेपेक्षाही या काळया मातीतून लसलसून जिवंत उभेराहिलेलं हे हिरवं जग खास त्याचं असतं. त्याच्या हातानंच उमलवलेलं, जोजवलेलं असतं. हे खळं हीच त्याची द्वारका असते. पंढरी असते. त्याच्या जगाचा त्याचा तोच राजा असतो. खळं हे त्याचं तीर्थक्षेत्र असतं"[२] जोतिबाच्या यात्रेपूर्वी म्हणजे चैत्र पुनवेच्या अगोदर वादळानं घातलेल्या धुमाकुळाचं सजीववर्णन "वादळवा-याच्या नांवान चांगभलं " या लेखांत नलगे यांनी केले आहे. वर्णन वाचतानाही वादळाची गतिमानता जाणवते. "चैतन्यारोपकरून केलेलं वादळाचं वर्णन, नलगे यांच्या वर्णनशैलीचा एक नमुना ठरायला हरकत नाही. वादळाच्या वर्णनात आलेले तपशील, पाल्हाळांत रूपांतरित होत नाहीत. उलट वादळ मात्र " मूर्त " ( Concrete ) होतं". "त्याचं ( वादळाचं) रूपजितकं

सुंदर तितकच उग्र....कधी आमंत्रण नसताही मुहूर्तांच्या आधीच लग्नमांडवांत उपटेल आणि आधीच अक्षता टाकून मोकळं होईल. दिवसभर दमलेल्या बाभळीच्या फाटक्या सावलीखाली कांदाभाकर खात बदलेल्या शेतक-यांची बांधावरची धडुतं उचलतं.....कृष्ण बनून पाणवठयावर धुणा-या बायकांची वस्त्रे पळवून नेतं....कधी पिंजराची सगळी टहळी उचलतं आणि आकाशांत नेऊन काडया काडया फेकून देतं. मस्ती आलं, की पाटलाच्या घराचे पत्रं उचकटत. भेदभाव नको म्हणून मांग म्हारवाडयांतल्या जुन्यापान्या झोपडया गदागदा हलवत असतं"[3]

उपरोक्त वर्णनांत वादळाचे सगळे गुण अवतरले आहेत. शहरांत राहिलेल्या निसर्गवेडया लेखकाच्या मनाची तगमग, तडफड आपल्याला " घरंगळलेला चंद्र आणि बाधा" या ललितलेखांत दिसते. या लेखांत " उंबराचे झाड" एक प्रतिमाच बनून जाते. उंबराशी जुळलेली लेखकाच्या अनाम नात्याची सावली संपूर्ण लेख वर शांतपणे पडलेली आहे. आठवणीतले गांव, माणसे, त्याशी संबंधित पूर्वस्मरणे , त्यांची ओढ, नितळनिरागस "मी" सारं कसं पारदर्शी होऊन, ललित साज लेवून या लेखांत अवतरलं आहे. " राखी आभाळ " यांत, खूप वर्षांनी गांवी गेलेल्या लेखकाला, आज सारा परिसर बदललेला पाहून, पूर्वीच्या आठवणीने जो विषाद वाटला त्याचे चित्रण केले आहे. ज्या परिसरांतल्या निळया आभाळानं त्याला एकेकाळी वेड लावलं, सौंदर्याचं दर्शन देत जगण्याचं बळ दिलं, तेच आभाळ आज राखी बनलेलं पाहून लेखक व्यथित होतो. यासर्व लेखांमधून वारणा परिसरांतील निसर्ग शब्दबध्द झालेला आहे. हा निसर्ग संवेदनशीलतेने टिपलेला आहे. लेखकाच्या तरल व हळुवार वृत्तीमुळे हा निसर्ग अधिकच भावकोमल झालेला आहे, असे म्हणायला हरकत नाही.

" मंतरकैफ "मधील नाटयात्मता

" मंतरकैफ " मधील नलगे यांच्या पूर्वस्मरणांना आणखीन एका गोष्टीचा स्पर्श झालेला आहे. त्यामुळे या स्मरणांना नाटयात्मकता"

लाभली आहे. ती अद्भुत आहेत, रोमहर्षक आहेत, त्यांत विलक्षण थरार ( Thrill ) आहे. नलगे यांचे बालपण, एरवी सामान्य माणसाच्या बालपणासारखे गेले नाही. त्या बालपणाला एका वेगळ्या थरार अनुभवाचा लाभ मिळाला आहे. गोरे सोजिर, त्यांच्या घोडयाची टाप, हातातला हंटर, त्यांची रोजची फेरी, भूमिगत चळवळीतील लोकांच्या पराक्रमी कारवायाबद्दलची घरातली मंद आवाजातील कुजबूज, सखामामाचं अपरात्री येणं आणि भूमिगतासाठी भाक-या घेऊन जाणं, त्याचं तारा तोडणे, तलाठयाचं नाक कापणे, चावडी लुटणे, पोस्टं जाळणे वगैरे प्रकार पत्री सरकारच्या तर्फे, त्यांचा पायांत पत्र्या ठोकण्याचा प्रकार, त्यांना पाहण्याचा मोह, त्यांची काल्पनिक चित्रे, क्रांतीवीरांची मिरवणूक, घरासमोरच्या वाडयांत पत्री सरकारच्या माणसाचं नरसिंहासारखं रूप, भूमिगत चळवळीचा गैरफायदा घेऊन गरिबांना लुटणारे बंडवाले, वडिलांच्यावर आलेला बंडवाल्यांचा घाला, सीत्याबा वडाराची प्रभातफेरी, त्यानं इंग्रज सोजिरांची उडविलेली भंबेरी, त्याचा तुरुंगवास, इंग्रजांना दर्यापार घालवण्याच्या घोषणा इ. रोमहर्षक घटनाप्रसंगानी नलगे यांच्या बालपणातील कांही वर्षे भारुन गेली आहेत. भूमिगत चळवळ ही बाहेरुन चालू नव्हती तर खास आईच्या भावाकडून सखामामाकडून घरातूनच चालूं होती. या सगळ्या घटनांचे संस्कार आणि परिणाम मनावर खोल झालेले म्हणून लेखकाला तिरंगा दिसला की सीत्याची आठवण येते, आपलीच माणसं आपल्याच भूमीशी बेइमान झाल्याच दिसलं की लेखकाला सीत्याचं " ते तुफान यायला हवं " असं वाटतं. " मंतरकैफ " मधील "भिरभिरणारा काळ: रिचरिचणारे भोवरे " " ते तुफान यायला हवं," "हेही एक जगणं " इ. ललितलेखामधून स्वातंत्र्यपूर्व काळांतील, वारणाखो-यांतील हे नाटयमय प्रसंग चित्रित झाले आहेत. बालमनाच्या जिज्ञासेतून, अंधारांत दबक्या आवाजातल्या कुजबुजीतूनि, किंवा वार्तांच्या रूपाने, निवेदनाच्या ओघांत नलगे हे प्रसंग सादर करतात उदा - इकडं तिकडं सामसूम घेऊन हळू आवाजात बोलायचं, "...गो-या साहेबाला समिंदरापलिकडे घालवायचाच म्हणं. चळवळ चाललीय...हेयच्यामागं गांधीबाबा हाय म्हणं.....माणसं तुरुंगात जात्यात त्येच्या बोलासाठनं... तारा तोडतात.....पोष्ट लुटतात...भूमिगत होत्यात. हया गावाला गोळी-

बार झाला...तमक्या गावची चौकी लुटली....सरकारधार्जिण्या तलाठयाचं नाक कापलं....गो-यांची पलटण भागात शिरलीय. वाडयावरच्या धनगरणीनं दंगलीत तिरंगी निशाण जाळलं..त्या जंगलात भूमिगत लपल्यात....गोरा सायब हादरून गेलाय...अमूक माणूस इंग्रजांचा खब-या आहे....तमुक कॉग्रीटांचा नद-या आहे. त्या कॉग्रीटवाल्याची घरची माणसं ठाण्यात डांबून ठेवलीत.... कॉंग्रीटवाल्यानीअमुक तुरुंग फोडला....काय होतंय कायकी "४ "हेही एक जगणं[1] या लेखांत स्वातंत्र्यपूर्वकाळांतील पत्री सरकारचे स्वरूप आपल्यासमोर उलगडत जाते. गरिबांना गो-या साहेबाद्दल चीड वाटायची. पत्री सरकारबद्दल आस्था असे. ते गोरगरिबांना छळत नसत. नलगे यांच्या बालमनाला पत्री सरकारला पहाव पहावंस वाटायचं, पण ते भेटणार कुठे ? दिसणार कसे ? थोरल्या बहिणीचं लग्न वाजंत्री न वाजवता झालं. कारण असला वायफळ खर्च करायचा नाही असं पत्री सरकारवाल्यानी बजावलं होतं, नलगे यांना वाटायचं -पाहुण्यांनी वाजंत्री वाजवून लग्न करावं म्हणजे ते येतील आणि अनायासे आपल्याला त्यांना पाहतां येईल. पण तसं झाल नाही. पण एकदा लेखकाच्या गावीच ( किंकाच्या वाडयावर त्यांना पहायचा योग आला. त्यावेळचा आपला अनुभव नलगे सांगतात तो असा : " वेळानं दार ( किंकाच्या वाडयाचं ) उघडलं गेलं. पत्री सरकारवाल्यांचा पुढारी बाहेर पडला. उंचापुरा. दणकट धोतर. शर्ट, गांधी टोपी. रुंद उभट चेह-यावर भरदार मिशांचा झुबका... धारदार नाक...भरदार छातीच्या माणसाच्या हातात वावभर गुळगुळीत तेलकट काठी.....काठीच्या दंडयाला हातात अडकवण्यासाठी लावलेला चमडी लोंबता पट्टा.....तो हातात अडकवून काठी हातात धरलेली..... पाहणा-यावर जरब बसवणारा एकूण रुबाब....गो-या सोजिरानी कितीही गोळया घातल्या तरी दुभंग न होणारी हनुमंताची छाती पाहून मनाला बरं वाटलं, माझ्या कल्पनेतले पत्री सरकारवाले प्रत्यक्षांत जुळत गेले.

बायकोला न नांदवणारा नवरा....मुलगी नांदायला न पाठविणारा बाप...कर्जात गरिबांना छळणारा गावठी सावकार...उद्दाम तलाठी.. सरकारधार्जिणा पाटील या किंकाच्या वाड्यात बोलावला जाई.... नमला तर ठीक, नाही तर जमिनीवर पाडत...त्याचे पाय वर धरीत... मग त्याच तळव्यावर त्या दंड्यानं पट्या ठोकाव्या तसे ठोकत... पाय लाल होई.....रक्त फुटे....पाळणा करूनच त्याला न्यावा लागे. ही शिक्षा पत्री सरकारवाल्यांची. चौमुलखांत त्याचा दरारा. नुसतं नांव काढलं.....चुकीचं पाऊल पडलं...तर थरकापरंच ." [5] " भिरभिरणारा काळ आणि रिचरिचणारे भोवरे," यांत देशभक्तीनं प्रेरित होऊन स्वातंत्र्यासाठी घरादाराची होळी करणारे भूमिगत आणि स्वार्थासाठी खंडणीसाठी, व्यक्तिगत वैर किंवा सूड उगविण्यासाठी हाणामारी करणारे, जाळपोळ करून पीक कापणारे, देखण्या बाईच्या घरावर धाप मारणारे, खंडणीची मागणी करणारे बंडवाले - या तत्कालीन दोन भिन्न प्रवाहांचे चित्रण आले आहे. भूमिगतांच्या नांवावर बंडवाल्यांचे हे उद्योग चालत. थोडक्यांत या सगळ्या घटनाप्रसंगानी, हकीकतीनी ही स्मरणे नाटयमय बनलेली आहेत. "नाटयरस " हा एक मंतरकैफ चा विशेषच/.

नद-या : करूणरसात्म व्यक्तिचित्र

प्रा. चंद्रकुमार नलगे यांच्या ललितलेखनात आपल्याला विविध प्रकारची माणसे भेटतात. ग्रामजीवनांतील बारा बलुतेदार, सुगीच्या दिवसांत पोटासाठी बाहेरून आलेले अस्वलवाले, मुंबयवाला, डोंबारी, फेरीवाले इ. प्रसंगोपात्र येणारी सरकारी माणसे, मास्तरवर्ग, गावचीच पण नोकरीनिमित्त परगावी असलेली माणसे आणि शेवटी पैपाहुणे इ. अनेक व्यक्तींचे निर्देश नलगे यांच्या ललितलेखांत येतात. "मंतरकैफ" ही

याला अपवाद नाही. बाबू कूपवाडकर, जत्रेतला फेटेवाला पावणा, आई, दादा, सीत्या, आक्का, आत्या, बाबूदा, घाटग्याची म्हातारी आप्पादादा आणि नांग-याची रखू या दुय्यमतिय्यम दर्जाच्या व्यक्तिरेखा "मंतरकैफ" मधील ललितलेखांत आपल्याला भेटतात. खास करुन ललितलेखांचे विषय झालेल्या व्यक्तिरेखा चार आहेत. पांडूबुवा व कुशाबुवा, व्यार उर्फ तुकाराम रामजी पाटील आणि नद-या. बालवयात आपल्या मनावर संस्कार केलेल्या पांडुबुवा व कुशाबुवा या दोन व्यक्तिरेखांचे चित्रण नलगे यांनी " रातवा" मध्ये केलेलं आहे. पांडुबुवा व कुशाबुवा, दोघेही कोडी घालयचे. दोघंही घोडयावरुन हिंडत फिरत. नलगे सांगतात- " दोघंही पायानं अधू. डोकी घोडयांच्या टापांची, खणखणीत वाणी. समोरच्या माणसांची हुशारी कवडीमोलाची ठरविणारी, पण तेवढया पातळीपर्यंत ते गेले नाहीत" ६ पांडुबुवा म्हणजे पांडू पाटील. मुंबईला गेला, जिवाची मुंबई करता करता जिवावर आलं नि पायावर घसरलं. मुंबईतल्या यंत्रानी गावाकडची वाट दाखविली. शहरी शहाणपणानं त्यालाएक निराळाच झरा फुटला. "हे जाणार जाणार ! त्याला काळ वा खाणार" असा आयुष्याचा हिशोब बोलू लागला. ग्रंथ वाचू लागला. देवळांतील घंटा नियमित वाजू लागली. समोरचा प्रत्येक माणूस जिव्हाळ्याचा वाटूलागला. पांडूचा बुवा झाला. गळयांत माळ आली. गंध बुक्का शोभू लागला. लोकांना चांगल्या गोष्टी सांगू लागला. कोडयात बोलू लागला आणि एकदा वाटेत घोडं थांबवून, सातवी पास होऊन इंग्रजी शाळेत जाणा-या नलगे यांना, पांडून कोडं घातलं - " मुंगी व्याली, शिंगी झाली, तिला दूध किती " ? पांडुबुवानं विचारलेला प्रश्न आयुष्यभर लेखकाची संगतसोबत करीत राहिला. त्याच्या शब्दानी लेखकाला बळ दिलं. असा हा साधा, सरळ सालस, इतरांच्या आयुष्यांत मंत्र पेरीत जाणारा पांडुबुवा. दुसरा कुशाबुवा. गोसाव्यापैकी. भल्यापहाटे उठून दारादारांत उभं राहून " अ लल ख " म्हणून पीठ मागे. लेखकाची आई झोळीत पीठ ओतून पायाचं दर्शन

घेई. तो सर्वांची चौकशी करी. भलं चिंती, प्रत्येक घरापुढे हेच. 'अल्लखनं सगळा गाव ताजातवाना होई. गावभर मांगल्य पसरल्या- सारखं होई. बुवा मोकळया वेळी माणसांत बसे. देवाधिकांच्या गोष्टी सांगे. कलगीतुरा, भेदिक असल्यापैकी कांही सांगत राही. या बुवांच्या अंगात कळा शिरल्या. तो घोडयावरूनच चाले. अल्लख बंद झालं. अध्यात्म बोलू लागला. कोडी घालू लागला अशा या कुशाबुवानं तालुक्यांत एक नंबरचं बक्षीस मिळवलेल्या नलगे यांना, " 'बिनबापाचा पुत्र जलमला, आईबी नव्हती घरी' " हे कोडं घातलं. पांडुबुवा आणि कुशाबुवा यांच्या कोडयामुळे नलगे यांच अफाट ग्रंथवाचन झालं. आणि हे ऋण त्यांनी "रावडा"त मान्य केल आहे. " राखेवरची रांगोळी " यांत तुकाराम रामजी पाटील उर्फ 'त्यार ' यांचे व्यक्तिचित्र आले आहे. तुकारामाचे जीवन जन्मापासूनच संघर्षमय होते. त्याने स्वत:च्या कर्तृत्वावर घर....दुकान...जमीन या सा-या गोष्टी मिळविल्या. गावात प्रतिष्ठा मिळविली. सज्जन, मदतनीस असा हा माणस गावच्या सर्वांच्या आवडीचे, आदराचे स्थान बनला. लग्न....मुलं...सुना...नातवंड असा परिसर वाढला. पण या सुखाला दृष्ट लागली. सुखी संसार उद्ध्वस्त झाला. व्यसनी मुलानी दुकानातल्या, घरातल्या वस्तू दागदागिने विकले. पाईप- लाइनसाठी घेतलेल्या कर्जाचं व्याज वाढत चाललं. कोर्टं, मानहानी, गरिबी यामुळे तुकाराम अस्वस्थ झाला. पण कुणापुढे हात वेंगलले नाहीत. लेखका- पुढेसुद्धा. अखेर गेलेले वैभव परत मिळविण्याचा त्याने निर्धार केला. नवससायास केले. पण व्यर्थ शेवटी बंद केलेले, कोळिष्टकांनी भूतमहाल केलेले दुकान उघडले. थोडया सामानाची जुळवाजुळव केली. जम बसू लागला. जिद्द स्वाभिमान चिकाटी, बाणेदार वृत्ती अंगी असल्यामुळे त्यारनी शून्यातून पुनर्निर्मिती केली याचा लेखकाला अभिमान वाटतो. " नद-या" या ललित- लेखांत नलगे यांनी " धुळा" उर्फ " नद-या" याचं अत्यंत " सजीव " ( Life organic ) आणि " कलात्मक " व्यक्तिचित्र रेखाटले आहे. नागझरीच्या प्रचंड कपारीवर उभं राहून टेहळणी करणारा

धुळया, त्याच्या शिकारीबद्दल, नजरेबद्दल नलगे लिहितात -
" त्याच्या इशा-यावरच डोंगरद-यातली शिकार चाले. त्याची
नदार शाबूत तर शिकर शाबूत, नाहीतर सगळ्यांचाच ताबूत. हा
नद-या पक्का लागतो. हेरक्या लागतो. तोच शिकारीचा खरा म्होरक्या
ठरतो. दहा गावात धुळाचं नाव झालेलंच नद-या म्हणून. जणू धुळा
जन्माला आलेला तो नद-या म्हणून. आला की एखादा ससा सहज
काठीला अडकवून न्यावा. धवधबयाच्या उंच पहाडी कपारीवर धुळा उभा
राहिला, की अवघा दरा त्याच्या नजरेच्या कप्प्यांत येई. द-यावर
उंच फिरणारी घारसुध्दा धुळाच्या किती तरी खाली तरंगतांना दिसे.
तरीही धुळांची नजर पट्टयावरच्या जाळवंडातील एवढसा सरडाही हेरी.
अत्यंत तीक्ष्ण....धारदार...लखलखती नजर. कुठल्या खिळ्यांत घोरपड
सरकली नि कुठल्या कपारीत खोकड घुसलं हे बरोबर सांगे"[7] उपरोक्त
वर्णनांतून धुळा " मूर्तिमंत " होतो. त्याचा हा बाहयाकार-एवढासा,
गिटक्याला. गुटगुटीत तकतकीत रंगाचा. चेंडूसारखा. डोक्याला तेल, कानात
अत्तरकापसाचा बोळा, पायांत गोंडियाचं जाड चप्पल, मनगटांत काळा
दोरा...असा धुळा त्याच्यावर गावाची माया. मनानं मोकळा फटकळ
खुसखुशीत बोलणं, कुठही कांहीही खाणारा, खिसे खाण्याच्या वस्तूंनी
भरलेले. प्रामाणिक, परोपकारी. हरकामी. पण धुळा या गावचा नव्हे.
त्याचे आईवडिल कामानिमित्त येऊन, स्थायिक झालेले. वडिलानी एक बाई
आणली. गोरी, शेलाटी, ही खरी बायको नव्हे अशी लोकांत कुजबूज
पण कामाला माणूस मिळतं म्हणून ही कुजबूज पुढे बंद झाली आणि
धुळाचा जन्म झाला. गावजेवण झालं. खोपटाला भिंती आल्या. धुळाला
ऊब मिळाली. पण एक दिवस आईबाप निघून गेले. पोरक्या धुळाला
गावान जपलं, वाढवलं. तो सगळीकडेच राहू, खावूपिवू लागला. घराची
आठवण आली की उंब-यावर बसून राहू लागला. त्याचं घराकडे येणंजाणं
बंद होऊ लागलं. मध्यंतरी वादळवा-याने आढं चिरकढून टाकलं. भिंतीत

वारूळ वाढली. बेवारशी कुत्री अंग टाकू लागली. धुळाला मिसरूड फुटली " तशी त्याच्या जीवाची कालवाकालव होऊ लागली. त्याच्यावर माया करणारा एवढा गाव भरला असतांनाही त्याला एकाकी वाटू लागलं होतं. आपलं विस्कटलेलं घर त्यानं साफसूफ केलं. छपराची डागडुजी केली. भिंती लिंपल्या. त्याला एकटं एकटं वाटू लागलं. मागच्या आठवणी भळभळून येऊ लागल्या. आई....वडील...त्यांच पळून जाणं...नाहीसं होणं एक वादळ आंतून दाटत येई. मग तो शिकारीच्या मुलुखावर जाऊन बसे खिन्न, उदास एकाकीपणे. आपल्या बरोबरीच्या पोरांची वरात जागविता जागविता तो थकून गेला होता. अनेकांच्या दाराला त्यांन तोरण आणली होती. अनेकाच्या लग्नांतल्या दिवळीत तेल घालण्याचं काम केलं होत. कालच्या झग्यांतल्या पोरी लेकुरवाळ्या झाल्या होत्या. धुळा हा गावाचा नुसताच मुराळी उरला होता....आणि एक दिवस धुळा गावातून नाहीसा झाला. त्याच्या घराच तडकं पोरांनी मोडलं, वाऱ्यानं आढं उस्कटलं, कुत्री जमीन उकरू लागली, तणकाट काढलं, भिंतीत वारूळवाढली आणि कळकीखालचा म्हातारा मेला तेव्हा त्याच्या सरणासाठी गावानं घराचं उरलंसुरलं वासं हिसकलं.... ( एक अत्यंत कलात्मक व्यक्तिचित्र कारुण्याने भरलेले. पण आंतरिक जिव्हाळयाने ओतप्रोत रंगवलेले. घटना, प्रसंग, संवाद आणि निवेदन या सर्वांच्या संमीलनांतून हे व्यक्तिचित्र अकारात जाते. एकूण धुळाची कहाणीच हृदयद्रावक, कोणत्याही प्रकारचा बटबटीतपणा येऊ न देता, भावविवश न होता, केवळ आत्मभावनेने परिमित शब्दांत धुळाचे व्यक्तिचित्र लेखकाने रंगवले आहे. लालित्याच्या सर्व छटासह ( याच्या उलटची स्थिती "टयार"ची झालेली आहे. " टयार " हे खरेखुरे पात्र असूनही त्यांत जिवंतपणा आला नाही. त्याचे प्रमुख कारण म्हणजे केवळ निवेदनांतून, वर्णनातून " टयार"चे व्यक्तिचित्र रंगवले आहे. त्यामुळे ते कसदार, रसपूर्ण वाटत नाही. ते पात्र मनावर ठसत नाही, सपाट पातळीवर घरंगळत राहते.

हिरवळीतील आर्द्रता जपणारे लेखन .

" मंतरकैफ " मध्ये राखी आभाळ " या ललितलेखांत लेखकाच्या मनाची व्यथावेदना अगदी ठसठशीतपणे अभिव्यक्त झाली आहे. जिथं आपण वाढलो, लहानाचे मोठे झालो तो मुलुख पार बदलून गेलेला. आपलाच मुलुख आपल्याला परका झालेला. तो डोंगर, तो सूर्य, त्या द-या, ती पठारे, तो भवतालचा निसर्ग सारंच कसं ति-हाइ-तासारखे परके झालेले, उजाड आणि ओसाड याची खंत नलगे यानी मोकळया मनाने शब्दबध्द केली आहे. तरीही गतकालाकडे पाहतांना कलावंताचे संवेदनक्षम कविमन जागे आहे. नलगे म्हणतात- " वा ला होतं, आता सारीच पडझड झाली आयुष्याची. मुखवटे घातलेल्या जगानं लुटल्यानंतर आपल्या मुलुखाची आठवण आपल्याला झाली. इथली माती आठवली. इथली शिणंजोलीची माणसं आठवली. ...एक हिरवळ नजरेत जागी झाली. काळजाच्या कातळांत ओलावा पाझरला"[6] या मनाच्या ताजे-पणामुळे, ओलाव्यामुळेच हिरवळीतील आर्द्रता जपणारे " मंतरकैफ "चे लेखन झालेले आहे. या सगळया लेखनाची प्रेरणा आणि त्यांचे खरे सामर्थ्य हे लेखकाने उभ्या केलेल्या गतजीवनाचे, निसर्गातील भाववेदनांचे ग्रामजीवनातील तत्कालीन सामाजिक संदर्भाचे, भेटलेल्या ख-या-खु-या माणसांचे आत्मविश्वाशी असणारे नाते हे आहे. लेखकाचे हरवलेले बालपण, अनुभवलेलं भावविश्व संवेदनशील मनाने " मंतरकैफ " n१५ नलगे यांनी पुन्हा टिपले आहे. " मंतरकैफ " मधील लेखकाचा आत्मा-विष्कार प्रदेशाशी, नियतिशी, माणसांशी, ग्रामजीवनांतील सांस्कृतिक परंपराशी एकजीव होऊन जातो. हया एकात्मतेमुळे, तदात्मतेमुळे लेखनात " बीजव्हाळा" आलेला आहे., सगळेच लेख जिवंत आणि रसार्द्र रससंपन्न झाले आहेत.

ग्रामीण संवेदनशीलता

वीसाव्या शतकाच्या आठव्या दशकांतील ग्रामीण ललित-लेखकांत प्रा. चंद्रकुमार नलगे हे अग्रेसर लेखक. ग्रामीण जीवनांतील विविध सांस्कृतिक अंगे त्यांच्या ललितलेखनात प्रामुख्याने आढळतात. ह्या अंगांच ते लालित्यपूर्ण दर्शन घडवितात. "मंतरकैफ" मधील ललितलेखाबद्दल प्रा. वसंत केशव पाटील लिहितात- " कधी आपले रौद्रभीषण रूप दाखवून घाबरविणारा, तर कधी सर्वस्वाचे दान उधळून देणारा हा निसर्ग. त्यांत आपले बाळकाळीज घेऊन कृष्णाच्या खोडकरपणाने लेखक वावरतो. पशुपक्षी, शेतीभातीचे वर्षचक्र, तळ्या-खळ्याचे सोनेरी भाग्य, ऊनपावसाची पाठशिवणी, ओढयाओहळाचे झुळझुळणे, गुराढोरांचा प्रपंच, लोकसाहित्य व लोकमानसातील श्रध्दासमजुती, मेटावरल्या अंबटचेंबट गोष्टी सोप्यापडवीतील ग्रंथपारायणे इ. गोष्टी जिज्ञासूपणे मनांत साठविण्याचा, कावमण्यातून इकडूनतिकडून फिरवून बघण्यात गमत वाटते. पायाला भिंगरी नि मनाला काही ना कांही गिरमिट लागल्यागत लेखक तरलपणे हे अनुभव टिपतो. तमाशा, जत्रा, पत्री सरकार सण, उत्सव, ग्रामीण खेळ इ. गोष्टी तो जसा वेचाव्या, तशा अनिवारपणे भावनिर्भर संवेदनशीलतेने अनुभवतो. बंडवाल्याच्या धाकाने गोंधळून व गारठून गेलेले ग्रामजीवनही तो चौकस नजरेने टिपतो. या बंडवाल्यामुळे निष्प्राण झालेले समारंभ-सोहळे रंगवितो."[१] ग्रामजीवनांतील विविध अंगांचा निर्देश उपरोक्त उता-यांत झालेला दिसून येईल. त्यांच्या आविष्काराचे स्वरूपही श्री. पाटील यांनी सांगितले आहे. ग्रामीण भागातून आल्यामुळे नलगे यांचे व्यक्तिमत्व समृध्द अनुभवानी बनलेले आहे. त्याचे दर्शन " मंतरकैफ " च्या पानापानातर आपल्याला घडते.

व्यक्तिमत्वाचा आविष्कार
-------------------

नलगे यांचे व्यक्तिमत्व रामायण-महाभारतातील कथानी सुसंस्कारीत झालेलं आहे. कोडी सोडविण्याच्या निमित्तानं खूपखूप ग्रंथांच वाचन झालेलं आहे. तुकाराम पाटील, पांडूरंग पाटील आणि कुशाबुवा या वडिलधा-याच्या उपकारानं कृतज्ञ राहिलेलं आहे. सखामामा, सी(त्या वडार यांच्यापासून देशप्रेमाची स्फूर्ती घेतलेली आहे. अबीर-गुलाल, बुक्क्याच्या संगतीन अध्यात्मप्रेमी बनलेलं आहे., चिंतनशील झालेलं आहे. वारणा खो-यांतील द-यापठारांनी, जलधारांनी आणि वादळवा-यानी जडणघडण केलेली आहे. हंगामबिनहंगामांतल्या शिवारानं, वृक्षलतानं, आभाळाच्या निळाईन, तांबडमातीनं, भारावून टाकणा-या चांदण्यात, रंगगंधानं, रणरणत्या ग्रीष्मानं, कोसळत्या वळीवांनं त्यांच व्यक्तिमत्व ग्रामीण संवेदनशीलतेन समृध्द झालेलं आहे. आणि म्हणूनच " मंतरकैफ " मधील लेखांना मनभावन असे काव्यात्म रूप प्राप्त झाले आहे. वारणा खो-याच्या रगेल आणि रंगेल व्यक्तिमत्वाच्या सा-या खाणाखुणा रससंपन्न भाषेत " मंतरकैफ " मध्ये उमटलेल्या आहेत. उत्कटता, संवेदनशीलता काव्यात्मता, चिंतन, कलात्मकता, अनुभवसमृध्दी, आणि स्पर्शरसरंगध्वनादमयी शब्दकळा इ. ललितगद्याच्या गुणविशेषांनी मंडित अशा " मंतरकैफ " चा आस्वाद म्हणजे एक आनंदसोहळा आहे!

अभिजात आत्मलयीची भाषा
-------------------

नलगे यांच्या अनुभवाच्या आविष्काराची पध्दती, ही खास त्यांची आहे. कारण ज्या मातीने ज्यांना घडवले, त्या मातीचे सारे रंग त्यांत मिसळले आहेत. आणि म्हणून ती अविकृत आहे, अकृत्रिम आहे. त्यांच्या काव्यात्म व्यक्तिमत्वाची दाट साय त्यांच्या लेखनशैलीवर पसरलेली आहे. त्यांच्या भाषेबद्दल प्रा. वसंत पाटील लिहितात", " आशय आणि भाषा दोन्हीबाबत ललितलेखन कवितेला जवळचे असते. यालेखांची भाषा एका अभिजात आत्मलयीत डहळून आविष्कृत झाली आहे. मृद्धगंधा-

बरोबर माणसूपणाचे रंग या भाषेत आपसूक अवतरले आहेत. भाषेचा फुलोरा लक्ष वेधून घेतो. " जिथं पाकोळया फिरल्या त्याच घरांत तुपाचे दिवे जाळतील "( ३६), " घरांतल्या गोष्टी " शेंगाबरोबर फोडल्या जात" (५४ ) " ज्या हातानं मातीचं सोनं केलेलं असतं, त्या हाताची माया भिकारबुलत्यांना मिळाली नाही. तरच नवल " ( २२ ), " डोईवरच आभाळ परकं झालं. पण तरीही रोवण्यासाठी घेतलेली हातातली निशाणं हातची सुटली नाहीत. ( ११६)[10]

नलगे यांच्या काव्यात्म शब्दकळेचे दर्शन पुढील वाक्यांतून घडते. उदा. " चांदण्यांत गप्पांच्या मैफलींनां स्वप्नांचा कैफ चढे. २. चांदणं द्रवून जाव तसं ३. घराघरातल्या ठावक्यातल्या तेलवाती थरारल्या ४. तांबड-मातीला भोवळ आल्यागत झाली. ५. पायाखालच्या वाटाच फितुर होत निघाल्या होत्या. ६. पणतीच धारेला लागल्यासारखी वाटते. ७. इथल्या वाटाही कुठंतरी उठून गेल्यासारख्या इ. इ. " मंतरकैफ " मध्ये आपल्याला अनेक काव्यात्म प्रतिमा भेटतात. उदा. काळोखाचा गर्भ, स्वप्नांतल्या गंधखुणा, रानची पानफुलं, स्वप्नांचा कैफ, वळीव-भिजला गंध, चांदण्याचे रेशीमपंखे, काळजाची कपिरी रानभर तानसूर इ. या नाजूक, तरल, हळुवार प्रतिमा अतीव संवेदनशील आणि अर्थव्यंजक आहेत. थोडक्यात नलगे यांची भाषा प्रवाही अकृत्रिम, आणि ओघवती अशी आहे. त्यांत ग्रामीण गोडवा आहे. नष्ट होत चाललेले, पण अर्थ-भरित असे कितीतरी शब्द त्यांच्या भाषेत आपल्याला भेटतात.

" गिटका", डावरा", कोचकोनी, व घुमान गिठी " वगैरे शब्दाच्या वापरामुळे आशयाला वेगळीच लज्जत येते.

## समारोप

रौद्रसुंदर निसर्गाचा सहवास, चित्त थरारून टाकणाऱ्या ४२ च्या घटना आणि मनांत कायमपणे ठसलेल्या व्यक्ती या आशयद्रव्यावर नलगे यांचे बालपण उभे आहे. अंतरलेल्या दिवसांतील मंतरलेल्या क्षणाचा कैफ त्यांना चढतो. आपल्याच कोषांत ते हरवून जातात. या मंतरकैफासाठी निवाऱ्याचे गर्भागार असलेले उन्हाळे झेलण्याची त्यांची तयारी असते.

## संदर्भटीपा


१. नलगे, चंद्रकुमार
मंतरकैफ
प. आ. पृ. १०३

२. नलगे, चंद्रकुमार
उनि
पृ. २१

३. तत्रैव
पृ. ७१

४. तत्रैव
पृ. ४४

५. तत्रैव
पृ. ५४ व ५५

६. तत्रैव
पृ. ५७

७. तत्रैव
पृ. १२७

८. तत्रैव
पृ. १२८

९. पाटील, वसंत केशव
महाराष्ट्र साहित्य पत्रिका
जुलै ऑगस्ट सप्टेंबर १९९१.

१०. पाटील, वसंत केशव
उनि
पृ. १०३

## प्रकरण सहावे

## उपसंहार

मराठी साहित्यांत स्वातंत्र्योत्तर कालांत ललित लेखनाचा प्रकार खूपच सकस आणि समृध्द झाला आहे. काव्यात्मता, चिंतनशीलता, अनुभवाची व्यामिश्रता, स्मरणाद्वारे, गतजीवनाचा वेध इ. वैशिष्टयामुळे आणि अनेकविध लेखकानी या प्रकारचे लेखन केल्यामुळे तर एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणूनही हे लेखन स्थिर होऊ पहात आहे. अशा परिस्थितीत त्याला आणखी वेगळे परिमाण अलिकडेच प्रा. चंद्रकुमार नलगे यांनी दिले आहे. ग्रामीण साहित्यांत ग्रामीण संवेदनशीलतेमुळे जे ललितगद्य त्यांनी लिहिले, त्याला पृथगात्मता प्राप्त झाली आहे. ग्रामीण समाजजीवन, सांस्कृतिक जीवन, संवेदनशीलता आणि तरल व काव्यात्म जाणिवामुळे हे ललितलेखन आगळेवेगळे उठून दिसणारे ठरले आहे. मराठीमधील साहित्यप्रवाहाने घेतलेल्या या नव्या वळणाचा शोध व अभ्यास गरजेचा वाटल्याने आतापर्यंत आपण " ललितगद्य - स्वरूप व विशेष, " मराठीतील ललित गद्याची वाटचाल", "गावाकडची माती " चे वेगळेपण, " चंद्रबनातल्या सावल्या " वाङ्मयीन विशेष "आणि " मंतरकैफ " एक रसास्वाद याप्रमाणे क्रमशः नलगे यांच्या ललित गद्याचा. सविस्तर विचार केला.

SH... ERSITY KOLHAPUR

## ललित गद्याचे विशेष

मराठी निबंधाचा जन्म एकोणिसाव्या शतकांतील वृत्तपत्रीय लेखनातून झालेला आहे. छत्रे, दादोबा पांडुरंग यांचे सुरुवातीचे निबंध " बालिश " स्वरुपाचे होते. त्यांनी इंग्रजीवरुन मराठीत निबंधरचना केली. लोकहितवादींचे निबंध " कांही " अंशी याला अपवाद होते. शैलीदार निबंधाचा जन्म १८७४ ते १९२० म्हणजे चिपळूणकर - टिळक आणि आगरकर यांच्या कालखंडात झाला. विषयाचा उपोद्‌घात, विषय विवेचन व उपसंहार अशी विषयाची मांडणी व प्रसादपूर्ण, ओजस्वी आणि प्रसन्न अशी भाषा हे या शैलीदार निबंधाचे विशेष होते. या निबंधाला एक झोका बसला आणि " गुजगोष्टी "च्या रुपाने लघुनिबंधाचा अवतार झाला. ना. सी. फडकेप्रणित हा लघुनिबंध १९४५ पर्यंत लोकप्रिय झाला, पण पुढे त्याचा साचा बनल्यामुळे इरावती कर्वे यांनी त्याचे ललितनिबंधांत रुपांतर केले. आत्मनिष्ठा, सौंदर्यानुभव, चिंतनशीलता, काव्यात्मता, रमणीय स्मरणे आणि निसर्गवर्णने या विशेषांनी युक्त असा ललितनिबंध सकस आणि समृध्द झाला. याच्यात भर म्हणून कांही चांगली " प्रवासवर्णने " लिहिली गेली. कांही " व्यक्तिचित्रे " जन्माला आली. त्यांचेही कांही विशेष ललितगद्यांत सामावले गेले. याचा तपशीलवार विचार प्रकरण एकमध्ये केलेला आहे.

## ललित गद्याची वाटचाल

ललित गद्य हा " मी " चा घेतलेला जाणीवनिष्ठ शोध असल्यामुळे, त्यांत " मी " ची विविधरुपे आढळतात. त्यामुळे ललितगद्याचे उपप्रकार निश्चित करणे महत्त्वाचे ठरते. आणि हे उपप्रकार ललितगद्याच्या " विशेषावरुनच निश्चित करुन, मगच ललितलेखनाच्या विकासाच्या वाटचालीचा • आढावा प्रकरण दोनमध्ये घेतलेला आहे. ना. सी. फडके, वि. स. खांडेकर,

आणि अनंत काणेकर यानी लघुनिबंध समृध्द केला. इरावतीबाई, दुर्गा भागवत, गो. वि. करंदीकर यांनी त्याला लालित्याचा साज चढवून तो विकसित केला. नागर अनुभवांनी अशाप्रकारे ललितनिबंध संपन्न होत असतांना १९६५ नंतर ग्रामीण संवेदनशीलतेचाही आविष्कार ( डोह ) त्यांतून होऊ लागला. महाराष्ट्राच्या विविध भागातून पुढे आलेल्या लेखकानी आपली ग्रामीण संवेदनशीलता ललितगधातून साकार केली. विशेषतः या शतकाच्या ८ व्या दशकात ही प्रक्रिया जोराने पुढे आली. प्रा. चंद्रकुमार नलगे हे या ८ व्या दशकांतील ग्रामीण ललितगद्य लेखक!

नलगे यांच्या ललित गधाची वैशिष्टये

१. ग्रामीण संवेदनशीलता :

नलगे यांच्या तीनही " गावाकडची माती " " चंद्रबनांतल्या सावल्या " आणि " मंतरकैफ " ( क्रमशः प्रकरणे ३, ४, ५) पुस्तकातील ललित लेखनाचा अभ्यास केल्यानंतर एक गोष्ट स्पष्टपणे आणि प्रकर्षाने जाणवली ती ही, की नलगे यांचे अनुभवविश्व पूर्णतः ग्रामीणसंस्कृती हाच आहे. स्वातंत्र्योत्तर काळांत ग्रामीणजीवनावर कथाकादंबरीवजा जे लेखन झाले, ते प्रथम आर्थिक आणि जातीय स्तरावरून झाल्याचे दिसते. दारिद्र्य हा ग्रामजीवनाचा जन्मजात वसा असला, तरी तिथल्या हर्षामर्शावर पोसलेल्या ग्रामजीवनाची जी एक संस्कृती असते, तिचे चित्रण विविध छटासह अगदी अल्पांशानेच साहित्यांत आल्याचे दिसते. खरे पाहता संस्कृतीच्या विविध अंगातून माणसाचा खरा 'चेहरा' दिसत असतो. खेडयांतल्या

दारिद्र्यांतहि पिचलेल्या माणसाचा " हसरा चेहरा", त्याची रंजक क्षेत्रे कथाकादंब-यांतून दुय्यमतिय्यम स्थानावरुनच अवतरली. नलगे यांच्या ललित गद्यातून मात्र ही ग्रामसंस्कृती हा हसरा चेहरा - ही रंजक क्षेत्रे उत्साहउदासीसह अग्रक्रमाने भरीवपणे आणि लालित्याच्या सर्व छटा घेवून अवतरली. उपरोक्त तीनही पुस्तकांतून विविध लोककलाकार, सांगीवांगीच्या वाटा, ठिकठिकाणच्या जत्रा, हुरडयाच्या रंगती, गु-हाळ गावाकडची नाती, वारणाखो-यांतला रम्याद्भुत निसर्ग, रंजक किस्से, सणउत्सव, सुगी, पेरणीचा हंगाम, श्रध्दा अश्रध्दा आणि अंधःश्रध्दा, भुते, म्हावसट आणि खवीस, सर्व ऋतूतील चांदणे, बारा बलुतेदार, नाना तऱ्हेची माणसे, बालमनाच्या गमतीजमती, पशुपक्ष्यांचे प्राणीजीवन आणि तळयाखळयाशी जुळलेले भावबंध इ. विविध अनुभवांतील अनोखेपण आणि त्यांच्या आविष्कारांतील सौंदर्य मोहून टाकणारे आहे. नलगे यांच्या रक्तांतच मातीची ओढ भिनलेली असल्यामुळे, साहजिकच संवेदनशीलतेने त्याचे ललितलेखन डहळून निघाले आहे. केवळ नागर अनुभवांच्या आविष्कारामुळे साचेबंद बनलेल्या मराठी गद्याला त्यांनी ग्रामीण संवेदनशीलतते"चे नवे परिमाण दिले आहे.

२. गतजीवनाचा रमणीय वेध

हे सारे ललितलेखन पूर्वस्मरणावर आधारित आहे. बालकाच्या निरागस आणि नितळ नजरेतून हे ललितलेखन साकारते. या रमणीय स्मरणांचे आविष्कारण नलगे यांनी अशाप्रकारे केले आहे,की त्यांचे बालपण " त्यांचे" न राहता, ते सर्वांचे बनून जाते. नलगे यांच्या बालमनावर कोणत्याही सांस्कृतिक दृष्टीची छाप नाही. त्यांच्या नजरेपुढे कोणत्याही " झपा " नाहीत, कोणतेही " पूर्वग्रह " नाहीत. त्यामुळे नलगे यांचे बालमन अनुभवाला निरागसपणे, निष्पापपणे सामोरे जाते, त्या अनुभवाचा कोपरान् कोपरा न्याहाळू शकते, त्यांतील सौंदर्यदर्शन घडवू शकते. हे बालमन

जितके चिकित्सक, जिज्ञासू आहे तितकेच ते आपल्यापरीने प्रसंगोपात चिंतनशीलही आहे. त्यामुळे या ललितलेखांतील स्मरणांना वेधकपणा आलेला आहे.

३. जिवंत व्यक्तिरेखाटन

नलगे यांचे ललितलेखन माणसांनी गजबजून गेले आहे ग्रामजीवनांतील बारा बलुतेदार, हरहुन्नरी कलावंत, सुगीतले खेळिये, नात्यातील लोक, अधिकारी वर्ग, लेखकाला संस्कारशील बनविणारी माणसे, गाव आणि परिसरांतील दुष्ट लोक आणि शेवटी कांही " वंदनीय" व्यक्ती इ. विविध वृत्तिप्रवृत्तींच्या माणसांनी नलगे यांच्या अनुभवाचा परिघ विस्तृत झालेला आहे. लेखकाला माणसे " प्रिय " आहेत. त्यांच्यातल्या दुष्टाव्याने ते व्यथित होतात. आणि पुण्याईने हर्षनिर्भर होतात. आपल्यावर संस्कार केलेल्यांचे तर ते सदैव ॠणी राहतात. त्यांच्या जीवनांत येऊन कायमचा ठसा उमटवून गेलेल्या व्यक्तिबद्दल ते भरभरुन लिहितात. नलगे यांच्या या ॠजुतेमुळे लेखनालाही " जीवांचा जिव्हाळा" प्राप्त झाला आहे. त्यानी रेखाटलेल्या सखा मामा, गुंजाबुवा आणि सीत्या वडार ( चंद्रबनातल्या सावल्या) व नद-या ( मंतरकैफ ) या व्यक्तिरेखा खासकरुन दीर्घकाळ स्मरणांत राहणा-या आहेत. वास्तव असोत वा कलात्मक असोत - नलगे यांच्या व्यक्ती जिवंत भासतात, हे त्यांचे वैशिष्टय होय.

४. निसर्ग-वर्णने

कोणत्याही भौगोलिक वातावरणाचा, गावगाडयाचा, जो अविभाज्य घटक निसर्ग त्याचा वारणा खो-यांतील रंगस्पर्श आणि गंधमयी आविष्कार नलगे यांच्या तीनही पुस्तकांत झालेला दिसून येतो. निसर्गाचे विविध आविष्कार नलगे यांना विविध पातळयावरुन जाणवतात, आणि नलगे ते

अतिशय संवेदनशीलतेने टिपतात. त्यामुळे त्यांच्या ललितलेखनात निसर्गालासुध्दा एक व्यक्तिमत्व लाभते. लेखकाच्या व्यक्तिमत्वाच्या पिंडच मुळी निसर्गाच्या लावण्यावर पोसलाय. तळ्याखळ्याचं, वळीव-भिजल्या पावसाचं, रौद्रभयाण वादळवाऱ्याचं, षोडशीच्या तोऱ्यात वावरणाऱ्या पाणंदीचं, अल्लड चांदण्याचं, अंगात भिनल्या उंबराचं, भाजणाऱ्या ग्रीष्माचं, गणेशागवंड कड्याचं आणि खेकड्याकासवांचं नलगे यांनी केलेलं वर्णन याला साक्ष आहे. ही सगळी वर्णने कल्पकता, काव्यात्मता आणि ऐंद्रिय संवेदना जागविणारी आहेत. अनेक प्रकारची फुले, झाडे आणि पशुपक्षी यांच्या निर्देशावरुन नलगे यांचे अवलोकन आणि सूक्ष्म निरीक्षण कळून येते.

५. रसमयता

लेखकाचे बालपण स्वातंत्र्यपूर्वकालात गेलेले. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी महाराष्ट्रात पर्यायाने वारणा खोऱ्यांत ज्या चळवळी चालू होत्या, त्याचे लेखकाला जवळून दर्शन घडलेले आहे. त्यामुळे या गतकालीन स्मरणांत त्याचा कुठे ना कुठेतरी संबंध येणे अपरिहार्य होते. " चंद्रबनांतल्या सावल्या" या पुस्तकांतील तीन लेखांत आणि " मंतरकैफ " मधील दोन लेखांत भूमिगतांचीचळवळ, ४२ ची क्रांती, पत्री सरकार आणि त्या काळांत भूमिगतांच्या नांवावर दहशत निर्माण करुन लूटमार करणारे बंडवाले यांच्याविषयीच्या घटना आलेल्या आहेत. लेखकाचे मामा सखामामा भूमिगतांच्या चळवळीत होते. बंडवाल्यानी लेखकाच्या वडिलावर हल्ला केलेला होता. तेव्हा या चळवळीशी लेखकाचा निकटचा परिचय होता. वरील घटनांचे रोमहर्षक चित्रण नलगे यांनी केले आहे. कधी कुजबुजीतून, कधी प्रकट संवादातून तर कधी सूचकपणे नलगे या घटनांचे निवेदन करतात. तत्कालीन या नाट्यपूर्ण

घटनामुळे निवेदनालाही नाटय रसमयता आलेली आहे. " गावाकडची माती " मधील " चाफा " " मंतरकैफ " मधील " नद-या " आणि " चंद्रबनातल्या सावल्या" मधील " वळण "या ललितलेखांमधील कारुण्य जिवाला चटका लावणारे आहे. ह्या कारुण्याचे वैशिष्टय म्हणजे नलगे भावविवश होत नाहीत. विनोदाचे झुळझुळते अस्तरही या ललित-लेखांना चिकटले आहे. नीलकंठेश्वराच्या दोन मूर्ती, शेंगा काढण्याच्या वेळचे प्रसंग, जनावरांच्या मस्करीचे दिवस, पत्री सरकारवाल्याला पाहण्या-वेळची बालमनाची स्थिती, पतंग उडवताना वा-याने उडविलेली धमाल इ. ठिकाणचा विनोद गमतीशीर, मिस्किल आणि खटयाळ स्वरूपाचा आहे. वादळवा-यांच्या नावानं चांग भलं " "(गावाकडची माती ) मधील " रौद्र " रस, " झपाटलेलं रान " ( चंद्रबनातल्या सावल्या ), मधील भयानक रस, "नजरबंद मुलुख : जेरबंद अवलिया " ( मंतरकैफ ) मधील " अद्‌भुत " रस आणि " चाफा " " सोनसळ " ( गावाकडची माती ) मधील " प्रेम "रस इ.इतर रसही उल्लेखनीय आहेत.

## ६. आत्माविष्कार

आत्माविष्कार हा ललितगद्याचा प्राण आहे. ललितगद्यांत " मी " ला प्राधान्य असते. ललितगद्य म्हणजे " मी " चा," मी " च्या व्यक्तिमत्वा"चा आविष्कार.आजचा ललितलेखक पूर्वीच्या लघुनिबंधाप्रमाणे कोठलेतरी जीवनसत्य बिंबविण्यासाठी लेखन करीत नाही, किंवा त्यासाठी काल्पनिक पात्रप्रसंगांची निर्मिती करण्याची तसदीही तो घेत नाही. उलट आजच्या ललितनिबंधकाराच्या लेखनांतील पात्रे लेखकाच्या जीवनात आलेली आणि म्हणून खरीखुरी असतात. ही पात्रे, या पात्रांच्या सहवासांत आलेला लेखक, त्यांच्यातील भावसंबंध, प्रसंगवैशिष्टये आणि त्यांतून प्रकट होणारा जीवनानुभव हे सर्व सत्य असते. ही पात्रे, लेखकाच्या भूतकालांत त्यांच्या जीवनांत निकटवर्ती आलेली,

असतात. व्यक्त झालेला अनुभव लेखकाशी संबंधित असतो. हा अनुभव लेखकाच्या भूतकाळातला । बालपणीतला असतो. साहजिकच त्यांत लेखकाचा आत्माविष्कार होतो. लेखकाच्या व्यक्तिमत्वातील चौफेरपणावर, वेधकतेवर, तिरकसपणावर व शोधक बुध्दीवर या लेखनाचे यश अवलंबून असते. हे यश, नलगे यांची तीनही पुस्तके अभ्यासल्यावर, त्यांना मिळायला हरकत नाही असे वाटते. अनेक व्यक्ती आणि वल्ली यांच्या सहवासातं,वारणा खो-याच्या तांबड मातीतं आणि निळया आभाळानं, थोर थोर ग्रंथाच्या संगतीनं, भवतालच्या रोमहर्षक घटनानं आणि अंगभूत नम्रता, प्रेमळपणा, भूतदया, आदरभाव, सहृदयता आणि ऋजुता या गुणानं नलगे यांच व्यक्तिमत्व समृध्द बनलेलं आहे. या समृध्द व्यक्तिमत्वाचा आविष्कार नलगे आपल्या ललितलेखनांतून करतात, नव्हे तो होतोच. त्यामुळे वाचकाला हे लेखन " " आत्मीय " वाटते. या अनुभवाविष्काराला, ऐकलेल्या गप्पा, दंतकथा, आणि आख्यायिका, नाटयात्मक घटना आणि अद्भुत किस्से यांचे आणखीन वेगळे पदर येऊन मिळतात. पर्यायाने लेखनाचे "रंजकमूल्य" ही वाढत जाते. शिवाय नलगे यांच्या ठिकाणच्या ग्रामीण संवेदनशीलमुळे" या आत्माविष्काराचे स्वरुप शोभादर्शकासारखे झाले आहे.

७. काव्यात्मता

नलगे हे कविप्रवृत्तीचे ललितलेखक (अधूनमधून त्यांच्या कविता प्रसिध्द होत असतात) या कविप्रवृत्तीमुळे ललितलेखनाला एक वेगळी खुमारी येते. करंदीकर, पांडगांवकर, ग्रेस ही याची चांगली उदाहरणे आहेत. काव्यात्मता हाही नलगे यांच्या ललितलेखनाचा एक महत्त्वाचा घटक आहे. ही काव्यात्मता अनुभव घेणे आणि तो अभिव्यक्त करणे या दोन्ही प्रक्रियेतून आपल्याला दिसून येते. "गावाकडची माती " या पुस्तकांतील मातीचे डोहाळे, सोनसळ, जत्रेचे मंतरलेले दिवस, चंद्र चांदण्याच्या साक्षी " चंद्रबनातल्या सावल्या" तील 'एक शापित स्वप्न', 'चंद्रबनातल्या सावल्या,'

गणेश गवंड : एक जरतारी पैठणी, एक होती परी, आणि " मंतरकैफ " मधील वादळवा-याच्या नावानं चां ग भ लं, घरंगळलेला चंद्र आणि बाधा हले डुले पाण्यावरी नाव इ. लेखांतून नलगे यांच्या काव्यात्म व्यक्तिमत्वाचे दर्शन होते. वर उल्लेखिलेल्या सगळया लेखांत हळुवारता, तरलपणा, संवेदनशीलता, भावोर्मी, सौंदर्यपिपासा आणि कल्पकता हे कविमनाचे सगळे विशेष स्पष्टपणे दिसून येतात.

८. चिंतनशीलता

चिंतनशीलता हा स्वातंत्र्योत्तरकालीन ललितगद्याचा एक प्रमुख विशेष मानला जातो. फडके यांच्या कलात्मक लघुनिबंधाला खांडेकर, काणेकरानी थोडीशी वैचारिक बैठक घालून दिली होती. पण काणे-करांच्या " विचाराला" चिंतनशीलतेचा प्रथमस्पर्श दिला तो इरावती कर्वे यानी. आत्मनिष्ठ चिंतनशीलतेमुळे ललितनिबंध आगळावेगळा झाला. पुढे करंदीकर भागवत, श्री. वि. कुलकर्णी, माधव आचवल इ. नी. आपल्या व्यक्तिमत्वानुरूप या चिंतनशीलतेचे वेगवेगळे आविष्कार दाखवले. या सर्व लेखकांचे ललितलेखन केवळ " स्मरण " जन्य ललितलेखनाचे नाही. त्यामुळे त्यांच्या चिंतनशीलतेचा परिघ मोठा आहे. नलगे यांचे लेखन पूर्वकालीन जीवनाचा, गतजीवनाचा, बालपणाचा वेध घेणारे लेखन आहे. म्हणजे नलगे यांचे बालमन - हा या स्मरणजन्य लेखनाचा केंद्राधिष्ठित " मी " आहे. खेडयातील सा-या घटनाकडे, लोकाकडे, निसर्गाकडे, हे बालमन अतिशय कुतूहलाने पाहते. असे पाहत असतांना अनुभवाचे जे जे पदर जाणवले ते ते सर्व बालमनाने इथे शब्दांकित केले आहेत. औत्सुक्य, जिज्ञासा आणि जे अनुभवाला आले त्याची कल्पनाविश्वात पुनर्निर्मिती ही बालमनाची वैशिष्टये, लेखकाने आपल्या प्रौढपणीही जोपासली आहेत. या सर्व लेखातून बालमनाचे एक निर्मळ, निव्याज सौंदर्य झिरपत न राहते. हे बालमन लेखकाच्या प्रौढ मनापासून खूप दूर आहे. त्यामुळे अनुभवाला हवा तसा रंग देणे, त्या अनुभवाचा रंग गडद करणे, आणि आपापल्या " बालपणी"

आपण किती " मोठे " होते याची वाचकाकडून तारीफ करून घेणे अशा प्रकारची वृत्तीप्रवृत्ती इथे नाही. बालपणीच्या बालमनाने सादर केलेल्या या आठवणी आहेत. नलगे यांच्या तीनही पुस्तकातील ललितलेखनाचे हे स्वरूप समजावून घेणे महत्त्वाचे आहे. कारण जी चिंतनशीलता आपण दुर्गा भागवतांच्याकडून, माधव आचवलांच्याकडून किंवा ग्रेसकडून आपण अपेक्षितो, ती चिंतनशीलता आपल्याला नलगे यांच्याकडून अपेक्षिता येणार नाही. असे असले तरी नलगे यांचे बालमन अनुभवाचा केवळ " साक्षीदार " म्हणून या लेखनात येत नाही. तर ते चिकित्सक आणि जिज्ञासू असल्यामुळे प्रसंगोपात्त " चिंतनशील" ही बनते. पण ते व्यामिश्र, खोल आणि व्यापक नसते, " चाफा " ( गावाकडची माती ) मधील मालन दूर गेल्यानंतरचे चिंतन, " देवाचिये द्वारी " ( चंद्रबनातल्या सावल्या ) मधील धरणीकंपानंतरचे चिंतन तसेच " राखी आभाळ " हे एक जगणं " ( मंतरकैफ ) मधील चिंतन हे लेखकाच्या वाढत्या वयाबरोबर प्रौढ होत गेलेले चिंतन आहे. कधी कधी लेखकाचे प्रौढमन लेखाच्या शेवटी चिंतनाची टिप्पणी करते. ती अत्यंत काव्यात्म, अर्थभरित आणि सूचक असते. " स्मरणजन्य लेखन " या लेखनमर्यादेमुळे आपोआपच नलगे यांच्या चिंतनशीलतेलाही मर्यादा पडलेल्या आहेत.

८. आकर्षक शैली

बोली भाषेचा समर्थ वापर केल्यामुळे नलगे यांच्या ललितलेखनाला एक अस्सल, जिवंत ग्रामीण ढंग प्राप्त झाला आहे. खास ग्रामीण पण आपल्याला अपरिचित असे कितीतरी शब्द या तीनही पुस्तकांत आपल्यासमोर येतात. उबाक (गरम ), हमलणे ( फणफणणे ), उमत ( उमेद ), भिर्डीला येणे ( तिरीमिरीला येणे ), गलका ( पूर्ण ) आणि बत्तरबाळ्या ( चिरपळ्या ) इ. कितीतरी शब्द नलगे यांची शैली लयदार बनवितात. गंधर्वासारखे पांढरे शुभ्र बगळे, " द-यात विरत जाणारी धून " पंड्या रोग झाल्यासारखं वादळ यासारख्या अर्थसघन प्रतिमा आणि शापित स्वप्न", रेशमी कापूस " " अक्षराच बेट", " लाजरी पाखंर "

इ. शाब्दबंध, यामुळे नलगे " यांची भाषा सहजसुंदर, औचित्यपूर्ण प्रवाही आणि लालित्यमयी बनलेली आहे. बांधेसूदपणा, नीटस आणि नेमकेपणा, सीमितता, अर्थगौरव, आटोपशीरपणा, आणि मिताक्षरत्व हे नलगे यांच्या वर्णनशैलीचे इतर घटक आहेत. थोडक्यात संवेदनांना मुखर करणारी शाब्दकळा, कोवळिक आणि रांगडेपणा मिरविणारी बोली, विरामचिन्हांचा अचूक वापर यामुळे नलगे यांची शैली आकर्षक बनली आहे.

१०. <u>कांही उणिवा</u>

१) या तीनही पुस्तकांतील लेखन बालपणावर आधारलेले आहे. तथापि या लेखनाला " सलगता" ( कालसलगता) नाही. एक सूत्र नाही. सुटे सुटेपण जाणवते. एका दृष्टीने हा दोष. परंतु कालसलगता आली असती तर हे लेखन ललित गद्याचे न राहता आत्मचरित्राचे झाले असते. २) कांही ठिकाणी अलंकरणाचा अतिरिक्त हव्यास जाणवतो. विशेषतः हा दोष " गावाकडची माती " या पुस्तकांत अधिक जाणवतो. ३) बा मृत्यो ! " गावाकडची भुतं " ( गावाकडची माती ), " हवेतले झोके, " रातवा " ( चंद्रबनातल्या सावल्या ) राखेवरची रांगोळी, " राखी आभाळ " ( मंतरकैफ ) इ. लेखांतील अनुभवांना " स्पंदनां"चे रूप येतनाही " ४) दोनचार ठिकाणी अतिशय काव्यात्मकतेमुळं अनुभवच धूसर झालेला आहे ५) प्रतिमांचा अतिरिक्त हव्यासही जाणवतो. ६) अर्धशतकापूर्वीचे ग्रामजीवन आज दूर कुठेतरी हरवल्यासारखं झाले आहे. १९४७ ला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ग्रामीण जीवनांत एक वेगळेच स्थित्यंतर घडून आले -येत आहे. विकासाच्या दृष्टीने हे इष्ट असले, तरी आपण कांहीतरी हरवत आहोत, कशाला तरी पारखे होत आहोत, याची एक अनाम रुखरुख जिवाला बैचैन करुन सोडत . शेत-शिवार गेले, कालचा माणूस आज दिसत नाही, प्राकृतिक सौंदर्य आज दृष्टिआड झाले आहे. सरमिसळ नागरीकरण होत आहे. ग्रामीण जीवनाचे अस्सल रूप नष्ट होत आहे.

हे हरवलेले ग्रामजीवनाचे अस्सल रूप नलगे यांनी आपल्या ललितलेखनातून

शब्दबध्द केले आहे. ते अतिशय तरल व संवेदनशील आहे. त्यामुळे नलगे यांच्या समकालीन व समव न पिढीला हे लेखन पुन:प्रत्ययाचा आनंद निश्चितच देईल यांत शंका नाही. पण इथे एक प्रश्न निर्माण होतो. आजच्या ग्रामीण लेखकांनी निर्माण केलेल्या वाङ्‌मयाचे मूळ स्वातंत्र्यपूर्वकालांत आहे. तो काळ, ते जीवन पाहिलेली, अनुभवलेली पिढी अजून हयात आहे. त्या पिढीच्या वाचकाला त्या वाङ्‌मयामुळे पुन:प्रत्ययाचा आनंद निश्चित मिळेल. जे नागर वाचक असतील त्यांना वेगळे अनुभव व निसर्गदर्शन होईल. परंतु ग्रामीण जीवनातून जी नवी पिढी उदयास येत आहे तिच्या पुढचे वास्तव, तिच्यासमोरचा निसर्ग, तिच्यासमोरची माणसे व ती अनुभवते ते जीवन, एकदम न वीन, वेगळे असे आहे. या नव्या पिढीला ५० वर्षापूर्वीच्या जीवनावरील ते साहित्य आपले वाटेल काय ? वाटणार नाही ! कारण " आजचे ग्रामीण जीवन पूर्णपणे बदलले आहे. म्हणायचे आहे ते असे : " आजचे ग्रामीण वास्तव" नलगे यांच्या ललितलेखंनात येत नाही : धगधगत्या वास्तवाची, खेडयातल्या दुखीकष्टी जीवनाची, तिथल्या दैन्यदारिद्र्याची जीवघेणी कळ नलगे यांच्या ललितलेखनात आली असती, तर या लेखनाला आणखी एक वेगळे मूल्य, परिमाण, वेगळी उंची लाभली असती...

...आणि हे " वाटणे " अनाठायी आणि अवास्तव नाही. तेवढे बळ नलगे यांच्या लेखणींत निश्चितच आहे. कारण " गावाकडची माती " " चंद्रबनातल्या सावल्या" आणि " मैतरकैफ " मधील ललित-लेखांना आज मराठी ललित गद्यात पृथगात्मता प्राप्त झाली आहे... !

## संदर्भ ग्रंथ सूची


अ.

१. आंबेकर वि. बा.
तरंग आणि तुषार
कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे,
प. आ. १९७०.

२. काणेकर अनंत
पांढरी शिडे
देशमुख आणि कंपनी पुणे,
प. आ. १९५७.

३. कुरुंदकर नरहर
स्वप्नगंधा
विविधा प्रकाशन, सेलू,
प. आ. १९६७

४. कुलकर्णी भीमराव
प्रदक्षिणा
कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे
सा. आ. १९८०.

५. कोलारकर रजनी
समकालीन साहित्य:प्रवृत्ती आणि प्रवाह
संपा. मृणालिनी पाटील, लांजेवार, धनकर.
विजय प्रकाशन, नागपूर, प. आ. १ मे ८५

६. खांडेकर वि. स.
प्रदक्षिणा
कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे,
सा. आ. १९८०.

७. गाडगीळ गंगाधर
पाण्यावरची अक्षरे
सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर
प. आ. मार्च, १९७९.

८. जहागिरदार चंद्रशेखर
मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप
संपा. गो. मा. पवार, म. द. हातकणंगलेकर
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
प. आ. १९८६

९. जोग ल. ग
निवडक ललित शिफारस
संपा. म. द. हातकणंगलेकर
मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई,
प. आ. जानेवारी १९९०.

10. ठाकूर रवीन्द्र
आनंद यादव : व्यक्ती आणि वाङ्‌मय
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
प. आ. जुलै, १९९३.

११. देऊळगावकर वि. पां.

देऊळगावकर चंद्रकांत

मराठी निबंध - लघुनिबंध : स्वरूप व विवेचन

मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे,

प. आ. जुलै, १९८१.

१२. नलगे चंद्रकुमार

१. गावाकडची माती

सन्मित्र प्रकाशन, कोल्हापूर

प. आ. ऑ. १९८४.

२. चंद्रबनातल्या सावल्या

सुरेश एजन्सी, शुक्रवार पेठ, पुणे.

प. आ. जुलै, १९८९.

३. मंतरकैफ

प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर,

अ. प. आ. १९९०.

१३. पाटील प्रसन्नकुमार

अक्षरगंध

सन्मित्र प्रकाशन, कोल्हापूर,

प. आ. १९८७.

१४. पाडगांवकर मंगेश

पाण्याचे पंख

श्रीनिवास विनायक कुलकर्णी

मौज प्रकाशन, मुंबई, प. आ. १९८७

१५. फडके ना. सी.
मराठी लघुनिबंधाचा जनक कोण ?
कुलकर्णी ग्रंथागार शनिवार पेठ पुणे,
प. आ. सप्टेंबर १९७६.

१६. यादव आनंद
१. पद्रक्षिणा ( खंड दुसरा)
कॉटिनेंटल प्रकाशन पुणे,
प. आ. १९९१.

२. " वाङ्मयीन शैली आणि तंत्र
संपा. म. द. हातकणगलेकर
अभिजात प्रकाशन कोल्हापूर,
प. आ. मार्च १९८१.

१७. वडेर प्रल्हाद
आशय आणि आविष्कार
मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे,
प. आ. मार्च १९८८.

१८. वर्तक चंद्रकांत
वाङ्मयाचे अध्यापन
संपा. डॉ. ना. गु. गिंडे डॉ. द. दि. पुंडे
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे,
प. आ. जाने १९९४.

१९. वेदान्ते मधुकर

गावाकडची माती = एक चिंतन ( संपादन )

सन्मित्र प्रकाशन, कोल्हापूर.

प. आ. ४ फेब्रु. १९८९.

२०. हातकणंगलेकर म. द.

मराठी कथा : रूप आणि परिसर

सुपर्ण प्रकाशन, पुणे,

प. आ. १९८६.

संदर्भ नियतकालिक सूची

ब.

१. " दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका "
ई, दौलतनगर, कोल्हापूर
एप्रिल-मे-जून १९९३,
जुलै, ऑगस्ट-सप्टेंबर १९९३.

२. " महाराष्ट्र साहित्य पत्रिका"
महाराष्ट्र साहित्य परिषद
टिळक रस्ता, पुणे
फेब्रुवारी १९९०, ऑगस्ट १९९१

३. " ललित "
३१६, प्रसाद चेंबर्स, मुंबई - ४००००४
मे - जून १९८६, ऑगस्ट १९८८, जुलै १९८९
जुलै १९९१. ऑगस्ट १९९२.